**<u>प्रेसनोट दि.०८/०३/२०१९</u>**
**<u>बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे</u>**

बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २३६/२०१७ भादविक. ३२३, ५०४, ५०६, १४१, १४३, १४७ व लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण करण्याचा अधिनियम कलम ७ सह ८, प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयामध्ये आरोपी नामे अविनाश सुनिल मापारी, वय २० वर्षे रा.म्हातोबाचीवाडी, आरबीएस कॉलनी, रूम नं.६, पुणे हा गुन्हा घडल्यापासुन दिनांक ०३/०७/२०१७ पासुन फरार होता. सदर आरोपीचा शोध घेतला असता तो मिळून येत नव्हता.

बंडगार्डन पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील पोलीस कर्मचारी निखील जाधव यांस बातमीदाराकडून बातमी मिळाली की, नमुद आरोपी हा दिनांक ०५/०३/२०१९ रोजी सकाळी प्रायव्हेट रोड, ताडीवाला रोड पुणे भागात नातेवाईकांना भेटण्यास येणार आहे. त्याप्रमाणे दिनांक ०५/०३/२०१९ रोजी बंडगार्डन पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी सापळा रचला असता, आरोपी नामे अविनाश मापारी हा यांस ताडीवाला रोड पुणे येथून सहा.पोलीस निरीक्षक श्री संदीप जमदाडे, पोलीस कर्मचारी निखील जाधव, कैलास डुकरे यांनी ताब्यात घेतले व सदर गुन्हयात अटक केलेली आहे.

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील सहा.पोलीस निरीक्षक श्री संदीप जमदाडे, पोलीस कर्मचारी निखील जाधव, कैलास डुकरे यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे**